आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र – संध्या. ७.०० वा.
१७ मे, २०१२ - गुरुवार

ठळक बातम्या

- सरकारनं फक्त सार्वजनिक कामासाठीच भूमी अधिग्रहित करावी, असं स्पष्ट करणारा स्थायी समितीचा महत्वपूर्ण अहवाल संसदेत सादर
- टू-जी स्पेक्ट्रम प्रकरणी चौकशी करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीला दुसऱ्यांदा मुदत वाढ
- एअर इंडियाच्या वैमानिकांचा संप बेकायदेशीर ठरविणाऱ्या याचिकेला आव्हान देणारी संपकरी वैमानिकांची याचिका दिल्ली उच्च न्यायालयानं फेटाळली
- मुंबई शेअर बाजारातल्या घसरणीला लगाम / निर्देशांकात ४० अंकांची वाढ

||<><><>||

सरकारनं खाजगी व्यवसायासाठी भूमि अधिग्रहण न करता फक्त सार्वजनिक कामासाठीच भूमि अधिग्रहित करावी असं स्पष्ट करणारा महत्वपूर्ण अहवाल आज संसदेत सादर करण्यात आला. भाजपा नेत्या सुमित्रा महाजन यांच्या अध्यक्षतेखालच्या ग्रामविकासासाठी असलेल्या संसदेच्या स्थायी समितीनं हा अहवाल सादर केला.

शाळा, रुग्णालयं, पिण्याचे पाणी अथवा सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पांसाठी, विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी, तसंच सिंचन प्रकल्पांसाठी भूमि अधिग्रहण विधेयचकाचा वापर व्हावा, असं या अहवालात म्हटलं आहे.

अधिग्रहित करायच्या जमिनीचा विस्थापितांना मोबदला द्यायच्या दृष्टीनं बहुसदस्यीय आयोग सरकारनं नेमावा, असंही या अहवालात सूचित करण्यात आलं आहे.

आपल्या उत्पादनाची विक्री करण्याच्या दृष्टीनं शेतकऱ्यांद्वारा चालवल्या जाणाऱ्या कंपन्यांना कर्ज देण्याचा अधिकार राष्ट्रीय सहकारिता विकास प्राधिकरणाला देण्याबाबत आज लोकसभेत विधेयक सादर झालं. कृषी राज्यमंत्री हरिश रावत यांनी सादर केलेल्या या विधेयकामुळे शेतकऱ्यांचं जीवन समृद्ध होणार असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळणार असल्याचं रावत यांनी सांगितलं.

<><><>

टू-जी स्पेक्ट्रम प्रकरणी चौकशी करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीला दुसऱ्यांदा मुदतवाढ देण्याचा निर्णय आज लोकसभेनं घेतला. संसदेचं हिवाळी अधिवेशन संपेपर्यंत या समितीला मुदतवाढ देण्याचा निर्णय लोकसभेत आज आवाजी मतदानानं घेण्यात आला.

या समितीचे प्रमुख पी.सी. चाको यांनी यासंबधीचा ठराव मांडला त्यानुसार संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या अखेरच्या दिवसापर्यंत आपला अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ दिल्याचं पी.टी.आय च्या बातमीत म्हटलं आहे.

१९९८ ते २००९ या कालावधीत दूरसंचार क्षेत्रातल्या धोरणात्मक बाबीसंबंधी अभ्यास करण्यासाठी ४ मार्च २०११ रोजी लोकसभेच्या २० आणि राज्यसभेच्या १० सदस्यांचा समावेश असलेल्या या संयुक्त संसदीय समितीची स्थापना केली होती.

<><><>

बीड जिल्हयात आष्टी तालुक्यातील धानोरा गावात आज सकाळी शेतकरी आणि पोलिस यांच्यात चकमक होऊन दहा पोलिस आणि सात शेतकरी जखमी झाले आहेत. आज धानोऱ्यात कपाशीचं बियाणं वाटप होत असताना कमी प्रमाणात बियाणं असल्यानं सुरुवातीला बाचाबाची झाली. त्यानंतर झालेल्या पळापळीत चेंगराचेंगरी होऊ लागली. पोलीसांनी हस्तक्षेप केला असता जमावानं पोलीसांवर दगडफेक सुरु केली. पोलीसांनी लाठीमार करुन अश्रुधुराची ४ नळकांडी फोडली याप्रकरणी पोलीसांनी आतापर्यंत ३ जणांना अटक केली असून धानोऱ्यात मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

<><><>

महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी या संस्थेतर्फे दिला जाणारा ‘आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ संपादक पुरस्कार’ नांदेड इथल्या साप्ताहिक जयक्रांतीचे संपादक डॉ.केशव शंकर धोंडगे यांना जाहीर झाला आहे. संस्थेतर्फे दरवर्षी राज्यातल्या एका ज्येष्ठ संपादकांना ज्येष्ठ संपादक पुरस्कार, राज्यातल्या मराठी पत्रकारितेत योगदान देणाऱ्या एका महिलेला पुरस्कार असे विविध पुरस्कार दिले जातात.

<><><>

सिंधुदुर्गमध्ये दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचं स्मारक उभं रहात असून, एक कोटी दहा लाख रुपयांच्या या प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी राज्यातल्या सर्व पत्रकारांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन मुख्यमंत्र्यांचे माहिती अधिकारी सतीश पाटणकर यांनी आज केलं. सिंधुदुर्ग जिल्हा पत्रकार संघ आणि सावंतवाडी तालुका पत्रकार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एका कार्यक्रमात पाटणकर बोलत होते.

जांभेकरांचं हे द्विजन्मशताब्दी वर्ष असल्यानं त्यानिमित्त सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या १०० ग्रंथालयांना जिल्हा पत्रकारसंघाच्या वतीनं जांभेकरांचं तैलचित्र प्रदान करण्यात येणार आहे. त्याचा शुभारंभ आज करण्यात आल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे.

<><><>

एअर इंडियाच्या संपकरी वैमानिकांनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या एक सदस्यीय पीठानं त्यांचा संप बेकायदेशीर ठरवणाऱ्या नऊ मे रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात दाखल केलेली याचिका आज दिल्ली उच्च न्यायालयानं फेटाळली. संपकरी वैमानिक हे न्यायालयाच्या अवमानप्रकरणी दोषी असल्यानं त्यांची याचिका विचारात घेता येणार नाही, असं उच्च न्यायालयानं म्हटलं आहे. वैमानिकांना संप बेकायदेशीर असून, तो मागे घ्यावा या न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केल्यानं संपकरी वैमानिकांवर अवमानप्रकरणी कारवाई होऊ शकते, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

न्यायमूर्ती संजय कौल आणि राजीव शकधर यांच्या पीठानं याप्रकरणी निर्णय काल राखून ठेवला होता. या संपाबाबत वैमानिकांवर कारवाई करत एअर इंडियानं ७१ वैमानिकांना निलंबित केलं आहे.

दरम्यान, एअर इंडियाच्या वैमानिकांच्या प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी सर्व संबंधित मान्यताप्राप्त कर्मचारी संघटनांची बैठक केंद्रीय हवाई वाहतूक मंत्रालयानं बोलावली आहे. केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री अजित सिंग यांनी आज बातमीदारांना नवी दिल्ली इथं ही माहिती दिली. सेवाज्येष्ठता आणि पदोन्नती संदर्भात या बैठकीत चर्चा होईल, असं ते म्हणाले. या संदर्भातल्या धर्माधिकारी समितीच्या अहवालाच्या अनुषंगानं आपण चर्चा करू असं ते म्हणाले.

एअर इंडियाच्या वैमानिकांनी संप पुकारल्यापासून विस्कळीत झालेली एअर इंडियाची हवाई वाहतूक आपत्कालीन वेळापत्रकाच्या मदतीनं पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

<><><>

डॉलरच्या तुलनेत रुपयात मोठी घसरण होऊन देखील मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज ४० पूर्णांक ३९ शतांशाची वाढ झाली आणि दिवसअखेर निर्देशांक १६ हजार ७० पूर्णांक ४८ शतांशावर बंद झाला.

युरोपीय शेअर बाजारात मंदी असूनदेखील ब्ल्यू चिप्स् कंपन्या, तेल शुद्धीकरण कंपन्या, स्थावर मालमत्ता आणि धातू क्षेत्रातल्या समभागांची आज जोरदार खरेदी झाल्याची माहिती बाजार सूत्रांनी दिली.

राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीदेखील ११ पूर्णांक ९५ शतांशाच्या वाढीसह ४ हजार ८७० पूर्णांक २० शतांशावर बंद झाला.

<><><>

आयपीएल स्पर्धेमधील कोलकाता नाईट रायडर्स संघाचा मालक अभिनेता शाहरुख खानच्या विरोधात मुंबई पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा नोंदवला आहे. शाहरुख खानविरोधात कालरात्री वानखेडे स्टेडियम इथं मारहाण आणि शिवीगाळ केल्याचे आरोप नोंदवण्यात आले आहेत.

याप्रकरणी एम.सी.ए चे संयुक्त सचीव नितीन दलाल यांनी दिलेल्या लेखी तक्रारीनंतर मरीन ड्राईव पोलीस ठाण्यानं तपासाचे आदेश दिले.

यासंदर्भात आपल्या निवासस्थानी घेतलेल्या पत्रकारपरिषदेत शाहरुख खाननं आपण मद्यपान केल्याचा इन्कार केला या उलट मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अधिकाऱ्यांनीच आपल्याबरोबर तसेच मुलांबरोबर गैरवर्तन केल्याचा आरोप शाहरुख खाननं केला. याप्रकरणी आपणच मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष विलासराव देशमुख यांच्याकडे अधिकाऱ्यांचे गैरवर्तन आणि त्यांनी वापरलेल्या भाषेसंबंधी तक्रार नोंदवणार असल्याचं शाहरुख खानने बातमीदारांना सांगितलं.

दरम्यान शाहरुख खाननं मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या नियमांचं उल्लंघन केल्यामुळे तसंच त्याने केलेल्या असभ्य वर्तनाबद्दल त्याच्यावर मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर प्रवेश करण्यावर अजीवन बंदी घालण्याचा निर्णय यापूर्वीच एम.सी.ए.नं घेतला आहे.

<><><>

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडयात हवामान मुख्यत: कोरडं राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

याकाळात विदर्भात हवामान कोरडं राहिल, असा नागपूर वेधशाळेचा अंदाज आहे.

||<><><>||

देशातल्या ज्येष्ठ नागरिकांना लागू होणाऱ्या निवृत्ती वेतनासाठी दारिद्रय रेषेची अट काढून टाकण्याची शिफारस केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री जयराम रमेश यांनी केली आहे. दारिद्रय रेषेच्या अटींमुळे अनेक कुटुंबांचं नुकसान होत असून, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धावस्था पेन्शन योजनेची व्याप्ती वाढवण्याची मागणी जयराम रमेश यांनी प्रधानमंत्र्यांना पाठवलेल्या एका पत्रात केली आहे.

या योजनेअंतर्गत सध्या देशातल्या ६० वर्षावरील सुमारे तीन कोटी ज्येष्ठ नागरिकांना महिन्याकाठी २०० रुपये दिले जातात.

<><><>

इंटरनेटवर कोणत्याही प्रकारचे निर्बंध लावण्याचा सरकारचा मानस नसून इंटरनेटच्या नियंत्रणाबाबतच्या नियमांवर सर्व पक्षांचा विचारविनिमय घेण्यात येईल असं केंद्रिय माहिती आणि दळणवळणमंत्री कपिल सिब्बल यांनी सांगितलं. भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे पी.राजीव यांनी याबाबत राज्यसभेत मांडलेल्या प्रस्तावावर ते बोलत होते.

संकेतस्थळांवरील माहितीचं नियमन करणारा सरकारी नियम रद्द करण्याबाबतचा स्थगन प्रस्ताव विरोधी पक्षानं राज्यसभेत मांडला होता. आक्षेपार्ह मजकूर संकेतस्थळावरुन गाळावा असा आदेश न्यायालयानं नुकताच दिला होता त्या पार्श्वभूमीवर हा प्रस्ताव मांडण्यात आला. अशा प्रकरणात हस्तक्षेप करायचा संसदेला अधिकार असून एखादा नियम बनवण्यासाठी सरकारनं त्यात काही सुधारणा कराव्यात अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे पी. राजीव यांनी केली होती.

<><><>

साठेबाज आणि सराफांनी केलेल्या जोरदार खरेदीमुळे सोन्या-चांदीच्या दरात आज वाढ झाली. गेले तीन दिवस झालेल्या घसरणीनंतर दिल्ली सराफाबाजारात दहा ग्रॅम मागे सोन्याच्या भावात आज १८० रुपयांची वाढ झाली आणि दर प्रति दहा ग्रॅम २८ हजार ६२० रुपये इतका राहिला. चांदीच्या दरातही आज साडेतीनशे रुपयांची वाढ झाली आणि दर प्रतिकिलो ५२ हजार ५५० रुपये इतका राहिला.

मुंबई सराफा बाजारात आज प्रमाणित सोन्याचा भाव १० ग्रॅम मागे २८ हजार १७० रुपये तर चांदीचा भाव प्रति किलो ५२ हजार ७०० रुपये इतका राहिला.

<><><>

नक्षलवादी कारवाया करण्याचा आरोप असलेल्या ७ नक्षलवाद्यांचा जामीन मुंबई सत्र न्यायालयानं आज नामंजूर केला. विशेष सरकारी वकील रोहिणी सालियन यांनी हा निर्णय दिला.

या सात जणांमध्ये ५ स्त्रियांचा समावेश असून, या सातही जणांनी आपला या प्रकरणात कोणताही संबंध नसल्याचं सांगून आपल्याला जामीन मिळण्याबाबत न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या सीडीनुसार त्यांच्याविरुद्ध पुरावा असल्याचं सालियन यांनी न्यायालयाला सांगितलं.

<><><>

अंदमान इथल्या सेल्युलर जेलमधील राष्ट्रीय स्मारक सोमवार दिनांक २८ मे रोजी खुले ठेवण्याचा निर्णय अंदमान निकोबार प्रशासनानं घेतला आहे. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना त्यांच्या जयंतीदिनी आदरांजली वाहता यावी यासाठी सेल्युलर जेलमधील वस्तुसंग्रहालय २८ मे रोजी खुले राहील असं अंदमानच्या कला आणि संस्कृती निदेशालयानं कळवलं आहे. यासंदर्भात माजी पेट्रोलियम मंत्री राम नाईक यांनी २ मे रोजी अंदमान निकोबारच्या नायब राज्यपालांना पत्र लिहून विनंती केली होती.

<><><>

नाशिक जिल्हापरिषदेच्या कनिष्ठ सहाय्यकाला लाचखोरी प्रकारणी तीन हजार रुपयांचा दंड आणि एका वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. बाळासाहेब सोनाजी निकम याला जुलै २०१० मध्ये पाच हजार रुपयांची लाच घेताना ताब्यात घेतले होते. त्याच्याविरुद्ध नाशिक इथल्या विशेष न्यायालयानं हा निर्णय दिला. अशी माहिती भ्रष्टाचार विरोधी पथकानं दिली. आंतरजातीय विवाह योजनेचा लाभ देण्यासाठी तक्रारदाराकडून लाच घेताना सापळा रचून निकम याला ताब्यात घेतले होते, असं पथकाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितलं.

<><><>